# निशाणी १ वरील आदेश

१. अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज मुंबई वारसा कायदा १८२७ चे कलम २ प्रमाणे मयत उत्तम गितासा निळकंठ व चंद्रकलाबाई उत्तमसा निळकंठ यांचे ते वारस आहेत असे कथन करुन वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जदार क्र. १ हा मयत उत्तम गितासा निळकंठ व चंद्रकलाबाई उत्तमसा निळकंठ यांचा मुलगा असुन अर्जदार क्र. २ ते ५ हया मुली आहेत. मयत उत्तम गितासा निळकंठ व चंद्रकलाबाई उत्तमसा निळकंठ हे अनुक्रमे दिनांक १५.१०.२०१२ रोजी व दिनांक १९.०७.२०१८ रोजी पुणे येथे मयत झाले आहेत. अर्जदारांना विविध सरकारी कार्यालये तसेच निमसरकारी कार्यालयामध्ये वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. मयत उत्तम गितासा निळकंठ व चंद्रकलाबाई उत्तमसा निळकंठ यांना अर्जदार व्यतिरीक्त इतर कोणीही वारस नाहीत. त्यामुळे अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी दाखल केला आहे.

३. अर्जदार क्र. १ ने निशाणी ११ वर स्वतःचे पुराव्याचे शपथपत्र दाखल करुन अर्जातील मजकुराचा शपथेवर पुनरउच्चार केला आहे. अर्जदारांनी निशाणी १४ व १५ वर उत्तम गितासा निळकंठ व चंद्रकलाबाई उत्तमसा निळकंठ यांच्या मृत्युच्या प्रमाणपत्राची प्रत दाखल केली आहे. तसेच अर्जदाराने निशाणी क्रं. १६ ते २० वर आधारकार्डची प्रत दाखल केले आहे. अर्जदार वगळता मयत उत्तम गितासा निळकंठ व चंद्रकलाबाई उत्तमसा निळकंठ यांना इतर कोणीही वारस नसल्याचे अर्जदाराने पुराव्यात सांगीतले आहे.

४. अर्जदारांनी निशाणी २१ वर दिनांक ०५.०४.२०२३ रोजीच्या देशोन्नती या वृत्तपत्रात अर्जा संबंधाताचे वारस प्रमाणपत्र देण्यास कोणाची हरकत असले बाबत जाहीर नोटीस प्रकाशीत करुन ती जाहीर नोटीस याकामी दाखल केली आहे. त्याअनुषंगाने आजतागायत कोणाचीही हरकत या न्यायालयास प्राप्त झालेली नाही. अर्जदाराने पुरावा बंद पुरसीस निशाणी २४ दाखल केली आहे.

५. वारस प्रमाणपत्राच्या आधारे वारसांना मयताच्या संपतीमध्ये मालकी हक्क प्रदान होत नाहीत. तसेच ही बाब 2006(6) **Bom.C.R.** 56 **Aloysius Manuel D'souza and ors. –vs.– Mary Kamala William Manuel D'souza** या न्यायनिवाडयात मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी स्पष्ट केली आहे व न्यायालय सदरच्या अर्जाच्या चौकशी दरम्यान अर्जदारांना मयताच्या संपत्तीत हक्क व

अधिकार आहेत अथवा नाहीत असा आदेश देवु शकत नाही.

६. अर्जदार क्र. १ ते ५ हे मयत उत्तम गितासा निळकंठ व चंद्रकलाबाई उत्तमसा निळकंठ यांचे कायदेशीर वारस असल्याचे शपथपत्रावर कथन केले आहे. अर्जदाराने निशाणी २१ वरील जाहीर नोटीस प्रसिध्दी केली आहे. परंतु, त्या जाहीर नोटीसीस कोणीही आक्षेप नोंदवलेला नाही. अर्जदार यांच्या शपथपत्रातील कथनावर अविश्वास ठेवण्यासारखे काही नाही. त्यामुळे अर्जदार हे मयत उत्तम गितासा निळकंठ व चंद्रकलाबाई उत्तमसा निळकंठे यांचे वारस असल्याचे प्रमाणपत्र देण्यास कोणतीही अडचण नाही. सबब, मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे –

**– आदेश –**

**१.** अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

**२.** अर्जदार क्र. १ ते ५ हे **मयत उत्तम गितासा निळकंठ व चंद्रकलाबाई उत्तमसा निळकंठ** यांचे कायदेशीर वारस असल्या बाबत वारसा प्रमाणपत्र जारी करण्यात यावे त्याकरीता अर्जदाराने योग्य तो न्यायशुल्क मुद्रांक ८ दिवसाच्या आत जमा करावा.

मानवत.
दिनांक २३.११.२०२३

**( एस पी शिलवंत )**
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, मानवत.